# प्रेसनोट

## जीवे मारण्याची धमकी देवुन जबरदस्तीने सोन्याचे दागिने चोरणारे चोरटे युनिट-२ च्या पथकाकडुन जेरबंद

पुणे शहरामध्ये शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हददीत दि.२०/७/२०१६ मध्ये शिवाजीनगर एस टी स्टँड या ठिकाणाहुन लिफ्ट देण्याच्या बहानाने गाडीमध्ये बसवुन फिर्यादी यांच्याकडील रोख रक्कम व सोन्याचे दागिने असे एकुण १,४२,१०० /- रूपयाचे सोन्याचे दागिन्यांची जबरीची चोरी करून जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत शिंवाजीनगर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन गुन्हयांचा क्रमांक शिवाजीनगर पोलीस ठाणे गुरनं. १६८/१६ भादविक ३९२, ५०४, ३४ प्रमाणे असा होता.सदरचा गुन्हयातील आरोपींचा सखोल तपास करून देखील शोध लागला नसल्याने गुन्हा कायम स्वरूपी तपासावर ठेवण्यात आलेला होता.

पोलीस निरीक्षक गजानन पवार यांना बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की, दोन इसम चंदननगर खराडी बायपास येथे मारुती वॅगनर कार नंबर एम.एच. १२ पी.एन. ६४९८ हि घेवुन उभे असुन ते पुणे ते अहमदनगर प्रवास करणारा एकटयाच प्रवाशाचा शोध घेवुन त्यास त्यांचे कारमध्ये बसवुन कार पुणे नगर रोडवर थोडी पुढे गेल्यानंतर त्यास जिवे मारण्याची धमकी देवुन त्याचेकडुन किमती वस्तु काढुन घेत असल्याचे गुन्हे करतात त्यांनी यापुर्वी सुध्दा अशा प्रकारचे गुन्हे केलेले आहेत व ते दोघे चंदननगर खराडी बायपास पुणे अहमदनगर रोडवर उभे राहुन एखादया इसमाचा शोध घेत आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने अधिपत्याखालील पथकास सदर संशयिताना ताब्यात घेवुन चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

त्याप्रमाणे युनिट -२ कडील पथक तयार करून चंदननगर खराडी बायपास येथे रवाना केले असता त्या ठिकाणी बातमीतील नंबरच्या मारुती वॅगन आर कारचा शोध घेतला असता नमुद वर्णनाची कार पुणे अहमदनगर हायवे रोडवर खराडी बायपास चौकाचे थोडे पुढे अहमदनगरकडे जाणा-या रोडच्या दिशेने उभी असलेली दिसली व त्यामध्ये दोन इसम बसलेले दिसले.सदर दोन्ही इसमांना ताब्यात घेवुन त्यांना त्याचे नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांची नावे १) सचिन विष्णु खामकर वय ३२ रा. प्रेमधन हडको अहमदनगर असे असल्याचे व कारचे शेजारी उभ्या असलेल्या इसमाने त्याने नाव २) विजयकुमार बन्सी रोडगे वय ४० रा. सर्टिझफाय हायस्कुल शेजारी पवार मळा, ता. शिरुर जि. अहमदनगर असे असल्याचे सागितले.सदर दोन्ही इसमांकडे दोन वर्षापुर्वी केलेल्या जबरीच्या चोरीच्या गुन्हयाबाबत विचारणा केली असता त्यांनी त्याबाबत उडवाउडवीची उत्तरे दिली होती त्यामुळे त्यांना अधिक विश्वासात घेवुन सखोल तपास केला असता दोन वर्षापुर्वी शिवाजीनगर येथुन एस टीं स्टॅन्डवरून एका इसमास औरंगाबाद येथे सोडतो असे सांगुन गाडीमध्ये बसवुन त्याच्याकडील रक्कम रूपये १,४१,१००/- रूपयांचे सोन्याचे दागिने जीवे मारण्याची धमकी देवुन जबरदस्तीने चोरून नेल्याची कबुली दिली.सदर दोन्ही इसमांनी वरील गुन्हेगारी कृत्य करण्यासाठी सन २०१६ मध्ये मारूती कार वापरलेली होती.**वर नमुद आरोपींकडुन फिर्यादी यांचेकडुन जबरदस्तीने चोरलेले एकुण ३ सोन्याच्या अंगठया (३०.५०० ग्रॅम वजनाच्या ),१ सोन्याची चैन(१८.५०० ग्रॅम), असे एकुण ५० ग्रॅम वजनाचे किमंत रूपये १,४२,१००/- (एक लाख बेचाळीस हजार शंभर)रूपयांचे सोन्याचे दागिने व गुन्हा करणेसाठी वापरलेली मारूती एल्टो कार (कि.रू.१,६०,०००/-) रूपयांची हस्तगत करण्यात आलेली आहे.सदरचा गुन्हा तब्बल दोन ते अडीच वर्षानी अज्ञात आरोपींचा शोध घेवुन,अतिशय कसोशीने तपास करून उघडकीस आणलेला आहे.**

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री प्रदीप देशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री.शिरीष सरदेशपांडे, सहा पोलीस आयुक्त, श्री.समीर शेख यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक गजानन पवार,सहा.पो.फौज तांबे,पोलीस हवालदार राजू केदारी, पोलीस हवालदार किरण पवार पो.ना.किशोर वग्गु,,पो.शि.प्रसाद जंगीलवाड,पो.शि.मुकूंद महाजन याच्या पथकाने केलेली आहे.

पोलीस निरीक्षक